# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

### मंगळवार, दिनांक ७ जुलै, २०२६

### (दुपारी १२-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**(क)** मंगळवार, दिनांक ३० जून, २०२६ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला श्री.श्रीकांत भारतीय व इतर वि.प.स. यांचा "राज्यात बनावट इंजेक्शनस्  व औषधांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ८९३५

**(ख)** तारांकित प्रश्न

**(ग)** सोमवार, दिनांक ६ जुलै, २०२६ रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**दोन कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

**(१) महसूल मंत्री** : "महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांचे सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(२) संसदीय कार्य मंत्री** : सन २०२६ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ ते दिनांक २५ मार्च, २०२६ या कालावधीत मा.मंत्री/मा.राज्यमंत्री महोदयांनी विधानपरिषद सभागृहात दिलेल्या एकूण ३२५ आश्वासनांची यादी, तसेच सन २०२६ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, पूर्तता करण्यात आलेल्या एकूण २३६ आश्वासनांच्या पूर्तता विवरणपत्रे यादीसह सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : विधानपरिषद विशेषाधिकार समितीचा खालील प्रकरणासंदर्भातील अहवाल सादर करणे :-**

सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री. सुनिल शिंदे यांनी उप मुख्य अभियंता (शहर), इमारत प्रस्ताव विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याविरूध्द दिनांक २ मे, २०२३ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण.

**चार : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने –**

**(गुरूवार, दिनांक २ जुलै, २०२६, शुक्रवार, दिनांक ३ जुलै, २०२६ व सोमवार, दिनांक ६ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेचे निवेदन (अनुक्रमांक १):-**

(१) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ९ वर सामाजिक न्याय मंत्री निवेदन करतील :-**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील रमाई आवास घरकुल योजनेअंतर्गत घरकुल मंजुरी व बिल वाटप प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात झालेला आर्थिक गैरव्यवहार.

**(शुक्रवार, दिनांक ३ जुलै, २०२६ व सोमवार, दिनांक ६ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने (अनुक्रमांक २ ते ५):-**

(२) **श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १३ वर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

जिल्हा ग्रंथालय संघ, विभाग ग्रंथालय संघ व महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ यांच्या अनुदानात वाढ करण्याबाबत.

(३) **श्री.जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १५ वर शालेय शिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

इयत्ता ९ व १० वी च्या गटातील संच मान्यतेच्या सूत्रात दिलेली सूट रात्र शाळांना आणि शहरातील अटींचे पालन करणाऱ्या शाळांना लागू करण्याबाबत.

(४) **श्री.सत्यजित तांबे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ११ वर सामाजिक न्याय मंत्री निवेदन करतील :-**

महाराष्ट्र जादूटोणाविरोधी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीतील कमालीची उदासीनता, नियमावलीचा अभाव आणि जिल्हास्तरीय समित्यांच्या रखडलेल्या नियुक्त्यांबाबत.

(५) **श्री.धीरज लिंगाडे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १४ वर सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री निवेदन करतील :-**

राज्यातील आरोग्य कर्मचाऱ्यांना संगणकीय कामे न देता प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रावर डाटा एन्ट्री ऑपरेटर नेमण्याबाबत.

**(६) श्री.सुनिल शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १६ वर मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

राज्यातील सर्वसामान्य ग्राहकांना प्रीपेड स्मार्ट मीटर बसविण्याबाबत महावितरणकडून राबविण्यात येत असलेल्या मोहिमेला तातडीने स्थगिती देण्याबाबत.

**(७) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २१ वर उप मुख्यमंत्री (नगरविकास) निवेदन करतील :-**

वस्तू व सेवा कर (GST) लागू झाल्यानंतर स्थानिक संस्था कर (LBT)/जकात रद्द झाल्यामुळे कोल्हापूर महानगरपालिकेला मिळणाऱ्या जीएसटी अनुदानातील तफावत, आर्थिक अडचणी व अनुदान वाढविण्याबाबत.

**(८) ॲड.अनिल परब, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २३ वर शालेय शिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

रोटरी प्रतिष्ठान खेड, ता.खेड, जि.रत्नागिरी संस्थेच्या बोगस कारभाराबाबत.

**(९) श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २० वर उद्योग मंत्री निवेदन करतील :-**

नागपूर एम.आय.डी.सी.च्या क्षेत्रातील जमिनीचा मोबदला ठरविताना प्रोग्रेसिव्ह इंडेक्स व प्रत्यक्षातील विकासाचा, भौगोलिक परिस्थितीचा सकारात्मक विचार करुन सर्व गावांना एकच दर लागू करण्याबाबत.

**(१०) श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १७ वर पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री निवेदन करतील :-**

छत्रपती संभाजीनगर शहरातील घनकचरा डेपोमध्ये मागील काही दिवसांपासून वारंवार आग लागून मोठ्या प्रमाणात विषारी धूर निर्माण होत असल्याबाबत.

**पाच : लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

**(शुक्रवार, दिनांक ३ जुलै, २०२६ व सोमवार, दिनांक ६ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (१) ते (३)] –**

(१) **श्री. झीशान सिद्दिकी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"मुंबई वांद्रे रेल्वे स्थानकाजवळील गरीब नगर झोपडपट्टी भागात अंदाजे ३५९ अतिक्रमक वास्तव्यास असून रेल्वेच्या ६ व्या मार्गीकेचा प्रकल्प विकसित करण्यासाठी तसेच अतिरिक्त सुविधांची उभारणी आणि विद्यमान रेल्वे मालमत्तेची योग्य देखभाल करण्यासाठी ही अतिक्रमणे हटविणे, रेल्वे प्रशासनाने अतिक्रमणे हटविल्यामुळे मा.मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली असता सदरहू अतिक्रमणे हटविण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार ३५९ अतिक्रमकांपैकी सुमारे १०० अतिक्रमक्रांवर ६ व्या मार्गीकेच्या प्रकल्पाचा थेट परिणाम होत असल्यामुळे त्यांचे अतिक्रमण हटवून त्यांचे पुनर्वसन करण्याच्या अनुषंगाने विभागीय अभियंता (इस्टेट/दक्षिण) रेल्वे प्रशासन यांनी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना माहे सप्टेंबर, २०२४ मध्ये पत्राद्वारे कळविण्यात येणे, याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाने अद्याप कोणतीच कार्यवाही न केल्यामुळे रेल्वे प्रशासनास रहिवाशांच्या अतिक्रमणामुळे काम करण्यास येत असलेल्या अडचणी, तसेच न्यायालयाच्या निर्णयानुसार अंदाजे ३५९ अतिक्रमीत रहिवाश्यांचे पुनर्वसन तात्काळ केल्यास रेल्वेस काम करणे सोयीस्कर होणार असल्यामुळे शासनाने याबाबत लक्ष घालून अतिक्रमक रहिवाश्यांचे तात्काळ पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(२) **सर्वश्री धीरज लिंगाडे, सतेज ऊर्फ बंटी पाटील, अभिजित वंजारी, सुधाकर अडबाले, अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्य शासनाने शालेय शिक्षण विभागांतर्गत केंद्रप्रमुख पदासाठी सेंट्रल TET परीक्षा माहे फेब्रुवारी,२०२६ रोजी घेण्यात येणे, या परिक्षेचा निकाल मार्च,२०२६ मध्ये लागणे, शासनाने दिनांक २० फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या पत्रान्वये माहे जानेवारी / फेब्रुवारी, २०२६ पर्यंत TET उत्तीर्ण उमेदवारांनाच केंद्रप्रमुख म्हणून घ्यावे, असे निर्देश देणे, वास्तविक, या पदाच्या जाहिरातीमध्ये केंद्रप्रमुख पदासाठी TET/CTET पात्र होणे, एवढीच अट असणे, शासनाने या वेळेवर घातलेल्या अटीमुळे CTET पात्रता परीक्षा उत्तीर्ण व गुणवत्ता यादीत असूनही उमेदवारांवर अन्याय झालेला असणे, अनेक उमेदवार नियुक्तीपासून वंचित होणे

व त्यांनी केंद्रप्रमुख म्हणून नियुक्ती मिळावी, अशी मागणी करीत असतानाही शासन दाखवित असलेली अनास्था, परिणामी शासनाप्रती होणारा असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनस्तरावरुन उत्तीर्ण व गुणवत्ता यादीत नाव असलेल्या उमेदवारांना केंद्रप्रमुख म्हणून नियुक्ती करण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री सुधाकर अडबाले, अभिजित वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, जयंत आसगावकर, धीरज लिंगाडे, सतेज ऊर्फ बंटी पाटील, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, डॉ. परिणय फुके, श्री. सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, योगेश टिळेकर, जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन परिपत्रक दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ अन्वये उच्च प्राथमिक स्तरावर गणित/विज्ञान, भाषा आणि सामाजिक शास्त्र या विषय संवर्गातील प्रत्येक किमान एक याप्रमाणे प्रशिक्षित पदवीधर अर्हता धारक शिक्षकांच्या नियुक्त्या प्राथमिक शिक्षकांमधून करण्यात आलेल्या असणे, परंतु, या प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांपैकी १/३ शिक्षकांना सेवाजेष्ठतेप्रमाणे पदवीधर वेतनश्रेणी देण्यात आलेली असणे, याविरूध्द राज्यातील याचिकाकर्त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल करून 'समान काम - समान वेतन' या नैसर्गिक न्याय तत्वानुसार सर्व विषय शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी देण्याबाबत विनंती केलेली असणे, त्यानुसार मा. न्यायालयाने याचिकाकर्त्यांच्या बाजूने निर्णय दिलेला असणे, त्यामुळे सरसकट वेतनश्रेणी लागू करण्याबाबत शिक्षक संघटनांनी केलेल्या मागणीचे गांभीर्य लक्षात घेता मुंबई उच्च न्यायालयाच्या, नागपूर खंडपीठाच्या निकालानुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी अनुदानित संस्थांमध्ये इयत्ता ६ वी ते ८ वी मध्ये शिकविणाऱ्या शिक्षकांना सरसकट पदवीधर वेतनश्रेणी लागू करण्याबाबत शासनाने याबाबत करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(सोमवार, दिनांक ६ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (४) ते (८)] –**

**(४) डॉ.राजीव पोतदार, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"राज्यातील अनेक नगरपरिषदांमध्ये नमुना क्रमांक ६४ संदर्भात प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने राज्य शासनाने दिनांक १४ ऑगस्ट, २०१५ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेद्वारे नगराध्यक्ष यांची धनादेशावरील सह स्वाक्षरीची

तरतूद रद्द करण्यात येणे, या अधिसूचनेविरुद्ध विविध नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष यांनी मा.मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली असणे, त्यानुसार सदर अधिसूचनेस स्थगिती दिली असून तो अंतरिम आदेश दिनांक १९ एप्रिल, २०२२ रोजी मा.उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाने कायम ठेवला असणे, त्यामुळे सदर न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी करणेसाठी शासनाने उपाययोजना करणे व अंतरिम निकाल लवकर मिळण्यासाठी शासनाने न्यायालयाकडे पाठपुरावा करण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे, नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीची पूर्वीची व्यवस्था लागू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप, सतेज ऊर्फ बंटी पाटील, अभिजित वंजारी, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, जयंत आसगावकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील उपनगरातील प्रवाशांच्या सोयीसाठी आणि लोकल रेल्वेवरील ताण कमी करण्यासाठी गुंदवली (रेड लाईन-७) ते अंधेरी पश्चिम (येलो लाईन-२ए) अशी थेट मेट्रो सेवा सुरू करण्यात आली असणे, दिनांक ८ एप्रिल, २०२६ पासून गुंदवली ते काशीगाव (रेड लाईन) मेट्रो सेवा सुरू झाल्यापासून, अंधेरी पश्चिमेकडील आनंद नगर, कांदरपाडा, बोरीवली पश्चिम, शिंपोली, कांदिवली, मालाड पश्चिम, गोरेगाव पश्चिम, ओशिवरा व अंधेरी पश्चिम या भागांत जाणाऱ्या प्रवाशांना दहिसर पूर्व येथे उतरून दुसरी मेट्रो पकडावी लागत असणे, थेट सेवा बंद झाल्यामुळे प्रवाशांना दहिसर पूर्व येथे गाडी बदलावी लागत असून, यामुळे प्रवाशांचा दररोज सुमारे २० मिनिटांचा वेळ वाया जात आहे, शालेय-महाविद्यालयीन विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक व नोकरदार वर्गाला नाहक मनस्ताप व त्रास सहन करावा लागत असणे, या दोन्ही मेट्रो लाईन्ससाठी थेट जोडणी करणाऱ्या स्वतंत्र मार्गिका उपलब्ध असतानाही, केवळ प्रशासकीय नियोजना अभावी या मार्गिकांचा योग्य वापर न करता थेट सेवा बंद ठेवण्यात आली असणे, त्यामुळे जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, परिणामी पश्चिम उपनगरातील पूर्व आणि पश्चिम भागांना जोडणारा हा थेट प्रवास पुन्हा सुसह्य करण्यासाठी गुंदवली ते अंधेरी (पश्चिम) अशी थेट मेट्रो सेवा तातडीने पूर्ववत सुरू करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री.मिलिंद नार्वेकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"व्याघ्र संरक्षणाच्या दृष्टीने संपूर्ण देशात अत्यंत मानाचे स्थान असलेल्या मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या सिपना वन्यजीव विभागांतर्गत येणाऱ्या चौराकुंड वनपरिक्षेत्राच्या अतिसंरक्षित गाभा क्षेत्रात तब्बल ११ वन्यजीवांचा संशयास्पद मृत्यू झाला असल्याची अत्यंत धक्कादायक घटना दिनांक २१ मे, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली असणे, हा प्रकार नैसर्गिक नसून, वाघांची शिकार करण्यासाठी पाणवठ्यावर जहाल 'विषप्रयोग' करून घडवून आणल्याचा दाट संशय वन्यजीव तज्ज्ञांनी व्यक्त केला असणे, मृत प्राण्यांमध्ये चार रानगवे, चार भेडकी, दोन माकडांचा समावेश असून, दोन भेडक्या (भेकर) गर्भवती असल्याचे आढळून आले असणे, या मृत प्राण्यांमध्ये आंतरराष्ट्रीय बाजारात करोडो रुपयांची तस्करी होणारे मेळघाटातील अत्यंत दुर्मिळ असे 'खवले मांजर' देखील मृतावस्थेत आढळून आल्याने वनविभाग हादरून गेला असणे, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने या संवेदनशील घटनेची अत्यंत गंभीर दखल घेतली असून, दिनांक २७ मे, २०२६ रोजी विशेष केंद्रीय चमूने थेट मेळघाटात येऊन घटनास्थळाची सूक्ष्म पाहणी केली असणे, यास्तव सदर प्रकरणाची गंभीर दखल घेऊन सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

(७) **श्री. कृपाल तुमाने, डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील खासगी ट्युशन क्लासेस व कोचिंगकडून दिशाभूल करणाऱ्या जाहिराती, खोट्या यशोगाथा व निकालांचा गैरवापर करून विद्यार्थी व पालकांची करण्यात येत असलेली आर्थिक लूट, खासगी ट्युशन क्लासेस व कोचिंगसाठी अवाजवी शुल्क आकारण्यात येणे, अशा संस्थांचे नियमन करण्यासाठी स्वतंत्र कायदा अथवा नियमावली नसल्यामुळे त्याचा गैरफायदा घेऊन विद्यार्थ्यांची व पालकांची फसवणूक होत असणे, ट्युशन क्लासेसकडून आकारण्यात येणाऱ्या अवाजवी शुल्कावर नियंत्रण आणण्यासाठी शुल्क नियामक यंत्रणा स्थापन करण्याची तसेच विद्यार्थ्यांवरील मानसिक ताण व स्पर्धेचा दबाव कमी करण्यासाठी समुपदेशन व संरक्षणात्मक उपाययोजना राबविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(८) **श्री. योगेश टिळेकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **दुग्धविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ ही पुणे जिल्ह्यातील ग्रामीण दुग्ध व्यवसाय, शेतकरी अर्थव्यवस्था व सहकार क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाची संस्था असणे, सदर संघामध्ये अत्यंत गंभीर स्वरूपाचा आर्थिक भ्रष्टाचार, नियमबाह्य आर्थिक व्यवहार, खोट्या नोंदी, बनावट व्यवहार, उपविधींचे उल्लंघन, संस्थेच्या

निधीचा अपव्यय, अनियमित खरेदी, अपारदर्शक कंत्राट प्रक्रिया व आर्थिक गैरव्यवस्थापन सुरू असल्याचे विविध बाबींमधून निदर्शनास येणे, नवीन डेअरी प्रकल्पासाठी सल्लागार नियुक्त करून अंदाजे १ कोटी रुपये इतकी फी अदा करणे, वार्षिक सर्वसाधारण सभेवर अवास्तव वाढीव खर्च करणे, संघाच्या कार्यक्षेत्रातील अनेक संस्था प्रत्यक्ष अस्तित्वात नसताना त्यांच्या नावावर वाहतूक मार्ग दाखवून बनावट वाहतूकीची देयके काढण्यात येणे, कोंढापुरी पशुखाद्य कारखान्यामध्ये कच्चा माल पारदर्शक पद्धतीने खरेदी न केल्याने तोट्यात चालणे, दूध विक्री व दूध संकलनामध्ये मोठी घट होणे, प्राथमिक दूध संस्थांना सभासदत्व देताना उपविधींचे उल्लंघन करून बोगस संस्था निर्माण करणे, संस्थेच्या भ्रष्टाचाराबाबत सन २०२२ मध्ये शासनाने नेमलेल्या चौकशी समितीने पुढे कोणतीही कारवाई न करणे, सन २०२६ मध्ये दोन सदस्यांची समिती नेमून भ्रष्टाचाराची चौकशी करण्याचे आदेश दिलेले असूनही अद्याप त्यावर काहीही कार्यवाही न होणे, यासाठी बोगस दूध संस्थांची आणि सदर संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय विशेष चौकशी समिती (SIT) मार्फत चौकशी करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**सहा : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

**सात : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

**(शुक्रवार, दिनांक ३ जुलै, २०२६ व सोमवार, दिनांक ६ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) (अनुक्रमांक १) :-**

**(१) श्री. विक्रांत पाटील,** श्रीमती उमा खापरे,श्री. प्रसाद लाड, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"पनवेल महानगरपालिका क्षेत्र सुमारे ११० चौ.कि.मी. असून वाढत्या लोकसंख्येनुसार पायाभूत सुविधांचे दीर्घकालीन नियोजन करणे आवश्यक असणे, शेलार धरण पूर्ण होईपर्यंत प्रलंबित पाणीपुरवठा योजना पूर्ण करून मोर्बे धरणातून अतिरिक्त पाणीपुरवठा उपलब्ध करुन देणे, वाढत्या वाहनसंख्येमुळे सिडकोमार्फत भूखंड उपलब्ध करून बहुमजली पार्किंग प्रकल्प उभारणे, पुढील वीस वर्षांचा विचार करून वीज वितरण व्यवस्था सक्षम करावी व वारंवार होणारा वीजपुरवठा खंडित होण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविणे, तळोजा एमआयडीसी परिसरातील औद्योगिक प्रदूषण रोखण्यासाठी सांडपाणी व विषारी रसायने सोडणाऱ्या उद्योगांवर कठोर कारवाई करणे, डम्पिंग ग्राउंड नागरी वस्तीपासून दूर स्थलांतरित करून महानगरपालिकेचा स्वतंत्र कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणे, खारघर, तळोजा, कामोठे व इतर भागांत अत्याधुनिक अग्निशमन केंद्रे सुरू करणे, सांस्कृतिक

विकासासाठी नाट्यगृहे, कला दालने, प्रदर्शन केंद्रे व सांस्कृतिक कट्टे उभारणे, युवकांसाठी आधुनिक क्रीडासंकुले व नागरिकांसाठी अत्याधुनिक सार्वजनिक वाचनालये उभारणे, कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांना ठोक मानधन, योग्य वेतन, पीएफ, ईएसआयसी व इतर वैधानिक लाभांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(सोमवार, दिनांक ६ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) (अनुक्रमांक २ व ३) :-**

**(२) श्री. अंबादास दानवे,** ॲड. अनिल परब, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"छत्रपती संभाजीनगर शहरातील नागरिकांना गेल्या अनेक वर्षांपासून तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत असणे, शहराच्या पाणी प्रश्नाचे कायमस्वरूपी निराकरण करण्यासाठी हाती घेण्यात आलेली समांतर जलवाहिनी योजना सुमारे २५ वर्षांपासून विविध टप्प्यांमध्ये प्रलंबित असणे, या कालावधीत शासन व संबंधित यंत्रणांकडून योजनेच्या पूर्णत्वाबाबत वारंवार आश्वासने देण्यात आली, मुदतवाढी जाहीर करण्यात आल्या, आराखड्यात बदल करण्यात आले, मात्र प्रत्यक्षात नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध झालेला नसणे, योजनेची कामे पूर्ण झाल्याचे दावे करण्यात येत असताना शहरातील अनेक भागांत अद्यापही वितरण जाळे, जलशुद्धीकरण केंद्र, पाईपलाईन जोडण्या, रस्त्यांची पुनर्बांधणी आदी कामे अपूर्ण असल्याचे निदर्शनास येणे, परिणामी नागरिकांना आठ ते पंधरा दिवसांनी पाणी मिळत असून, उन्हाळ्यात परिस्थिती अधिकच गंभीर झालेली असणे, दुसरीकडे मराठवाड्यातील अनेक गावे व वाड्यांना शासनामार्फत टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत असणे, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणावर टँकर सुरू असल्याने जलव्यवस्थापनातील त्रुटी आणि नियोजनातील अपयश अधोरेखित होत असणे, सदर योजनेच्या विलंबामुळे प्रकल्प खर्चात किती वाढ झाली, संबंधित कंत्राटदारांवर अथवा अधिकाऱ्यांवर कोणती जबाबदारी निश्चित करण्यात आली, विलंबाबाबत कोणती दंडात्मक कारवाई करण्यात आली तसेच योजना पूर्ण होण्यासाठी निश्चित कालमर्यादा कोणती आहे, याबाबत जनतेमध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे, सदर बाब छत्रपती संभाजीनगर शहरातील लाखो नागरिकांच्या मूलभूत पिण्याच्या पाण्याच्या हक्काशी संबंधित असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३)** **सर्वश्री श्रीकांत भारतीय,** अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"सध्या राज्यात संतपीठ हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात एक विभाग म्हणून असणे, त्या ऐवजी संतपिठाला स्वतंत्र विद्यापीठाचा दर्जा मिळण्याची आवश्यकता असणे, तेथे घेण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमाला सर्टिफिकेट कोर्स ऐवजी पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी असा दर्जा देण्याची आवश्यकता असणे, त्या अनुषंगाने निधी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाची आवश्यकता असणे, संतपिठाच्या माध्यमातून युवकांमध्ये नैतिकता, समता, अध्यात्मिक आणि सामाजिक ऐक्याची मूल्य रुजविण्यासाठी विशेष कार्यक्रम आखण्याची आवश्यकता असणे, संतपिठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची सुविधा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**(४)** **डॉ.नीलम गोऱ्हे,** श्रीमती उमा खापरे, डॉ. मनिषा कायंदे,डॉ.प्रज्ञा सातव, श्रीमती माधवी नाईक, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"महाराष्ट्रात 'PCPNDT' कायदा लागू असतानाही, माहे एप्रिल व मे, २०२६ मध्ये पुणे (केडगाव), सोलापूर आणि फलटण परिसरात उघडकीस आलेले बेकायदेशीर गर्भलिंग निदान आणि गर्भपात रॅकेट संपूर्ण राज्यासाठी चिंतेची बाब असणे, या प्रकरणात डॉक्टर, दलाल, पोर्टेबल सोनोग्राफी मशिन पुरवठादार, आर्थिक व्यवहार, बायोमेडिकल कचऱ्याची विल्हेवाट तसेच अनेक जिल्ह्यांपर्यंत पोहोचलेले जाळे समोर आले असून तपासादरम्यान नवनवीन धागे-दोरे उघड होणे, आरोपीला अटक झाली असली तर मुख्य सुत्रधार, आर्थिक लाभार्थी आणि संपूर्ण साखळी उघड करणे आवश्यक असणे, काही खाजगी रुग्णालयांमध्ये PCPNDT तसेच MTP कायद्याचे उल्लंघन झाल्याची प्रकरणे समोर येणे पशुवैद्यकीय वापरासाठी असलेल्या पोर्टेबल सोनोग्राफी मशिनचा गैरवापर, डॉक्टर व पुरवठादारांची भूमिका, आर्थिक व्यवहार, बँक खात्यांचा वापर आणि पुरावे नष्ट करण्याचे प्रयत्न केल्याची गंभीर बाब समोर येणे, त्यामुळे हा केवळ स्वतंत्र गुन्हा नसून संघटित गुन्हेगारीचे स्वरूप धारण केल्याचे दिसून येणे, ग्रामीण भागात आशा सेविका व अंगणवाडी सेविकांकडे गर्भवती महिलांची माहिती उपलब्ध असतानाही संशयास्पद गर्भपात, अचानक बेपत्ता होणाऱ्या महिला किंवा बेकायदेशीर गर्भलिंग निदानाची माहिती वेळेवर प्रशासनापर्यंत न पोचणे, जिल्हास्तरीय समन्वय, ग्रामपंचायत, तंटामुक्त समित्या, आरोग्य विभाग, पोलीस, महिला व बालविकास विभाग, FDA आणि सायबर यंत्रणांमध्ये प्रभावी समन्वयाचा अभाव दिसून येणे, PCPNDT नियम 3-B नुसार सोनोग्राफी मशिन उत्पादक व पुरवठादारांनी प्रत्येक

मशिनच्या विक्रीची माहिती शासनाला देणे बंधनकारक असतानाही अशा मशिनचे ऑडिट, मागोवा व वापरावर पुरेसे नियंत्रण नसल्याचे दिसून येणे, अधिकृत मशिनवर Silent Observer, GPS Tracking किंवा डिजिटल देखरेखीची प्रभावी अंमलबजावणी अद्याप झालेली नसणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**आठ : शासकीय विधेयके –**

**(क) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १९ – महाराष्ट्र सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२६

**(ख) विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

**(१)** सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १७ – भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १७ – भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

(२) सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १८ – महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (चौथी सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १८ – महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (चौथी सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

**(३)** सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १९ – महाराष्ट्र सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२६

**(ग) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(१)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---------------------------------------------------------------------------

**(२)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ - महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ - महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---------------------------------------------------------------------------

**(३)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

**(४)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४८ - महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४८ - महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

(घ) **विधानसभेने संमत केल्यास – विचार, खंडशः विचार व संमत करणे.**

(१) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५२ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६

**(२)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ - महाराष्ट्र चिकित्सा आस्थापना (नोंदणी व विनियमन) विधेयक, २०२६

(३) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५३ - महाराष्ट्र पोलीस आणि महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रूम) यांमधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२६

**(४)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५४ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६

**(५)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५५ - महाराष्ट्र सावकारी (नियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६

(ङ) **विधानसभेने संमत केल्यास – विधेयक विचारात घेणे :-**

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५६ - महाराष्ट्र मुद्रांक (चौथी सुधारणा) विधेयक, २०२६

**नऊ : म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

**सर्वश्री विक्रम काळे,** प्रविण दरेकर, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री प्रसाद लाड, हेमंत पाटील, पंकज भुजबळ, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, शिवाजीराव गर्जे, अमरिशभाई पटेल, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री संजय खोडके, प्रविण पोटे-पाटील, श्रीमती भावना गवळी, सर्वश्री इद्रिस नायकवडी, राजहंस सिंह, कृपाल तुमाने, झीशान सिद्दिकी, डॉ. परिणय फुके, सर्वश्री किशोर दराडे, अनिकेत तटकरे, ज्ञानेश्वर म्हात्रे, चंद्रकांत रघुवंशी, विक्रम काकडे, श्रीमती चित्रा वाघ, श्री. रविंद्र फाटक,

श्रीमती उमा खापरे, सर्वश्री दुष्यंत चतुर्वेदी, सदाशिव खोत, किरण सरनाईक, विक्रांत पाटील, गोकुळ गीते, योगेश टिळेकर, वसंत खंडेलवाल, अमित गोरखे, सुनील कर्जतकर, धर्मगुरू बाबूसिंग राठोड, प्रमोद जठार, श्रीमती माधवी नाईक, श्री. प्राजक्त तनपूरे, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री विवेक कोल्हे, संजय भेंडे, अरुण लखानी, अमरनाथ राजूरकर, राजेंद्र राऊत, अविनाश ब्राम्हणकर, धैर्यशील कदम, नंदकिशोर महाजन, सुहास शिरसाठ, बसवराज पाटील, डॉ. राजीव पोतदार, **वि.प.स यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"राज्य शासनाने शैक्षणिक क्षेत्रात वेगवेगळया उपाययोजना हाती घेतल्या असणे, आरटीई कायद्याच्या अंमलबजावणीत सुसुत्रता आणण्याची आवश्यकता, नवीन संच मान्यतेच्या निकषामुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर शिक्षक अतिरिक्त होणे, ऑनलाईन संचमान्यतेमुळे शिक्षक कर्मचाऱ्यांचे वेतन रखडणे, पवित्र पोर्टल भरतीमध्ये शिक्षक मिळण्याच्या दृष्टीकोनातून सुधारणा आवश्यक असणे, इयत्ता ११ वी प्रवेशासाठी ऑनलाईन पध्दत ठेवल्यामुळे डिसेंबर अखेरपर्यंत प्रवेश प्रक्रिया चालू राहिल्याचे निदर्शनास येणे, ईबीसी शुल्काचे दर अत्यंत तुटपुंजे असल्याने निधीअभावी विद्यार्थी अनेक शिष्यवृत्तीपासून वंचित राहणे, जिल्हापरिषद प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये मुख्याध्यापक व शिक्षकांची पदे तात्काळ भरण्याची आवश्यकता, विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, शालेय पोषण आहार यांसारख्या सुविधा वेळेत मिळण्याची आवश्यकता, वेतनोत्तर अनुदान वेळेवर न मिळणे, "कायम" शब्द वगळल्यानंतर टप्पा अनुदान देताना प्रचलित धोरण मोडीत काढणे, २०%, ४०%, ६०% व ८०% अनुदान घेत असलेल्यांना पुढील टप्पा अनुदान देऊन सर्वांनाच १००% अनुदान देणे गरजेचे असणे, ज्या शाळांनी मूल्यांकनाचे निकष पूर्ण केले त्या व राहिलेल्या सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्यांना सुध्दा अनुदान देणे आवश्यक असणे, सन २००५ पूर्वी सेवेत आलेल्या परंतु टप्पा अनुदान व विनाअनुदान शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना न्यायालयीन निर्णयाप्रमाणे जुनी पेन्शन योजना लागू करणे गरजेचे असणे, संगणक शिक्षकांना वेतन अनुदान सुरु करणे, शिक्षकेत्तर कर्मचारी भरती करणे गरजेचे असणे, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना १०, २०, ३० ची वेतनश्रेणी लागू करणे, वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रशिक्षण पुर्वीप्रमाणे ऑनलाईनच करणे गरजेचे असणे, आदिवासी डोंगराळ भागात २०/३० विद्यार्थ्यांना एक तुकडी मंजूर करण्याची आवश्यकता, शाळांचे संचालन निकोप होण्यासाठी मंजूर अधिकाऱ्यांची पदे तातडीने भरणे गरजेचे असणे, शाळांची, शिक्षक-कर्मचाऱ्यांची सर्व कार्यालयीन कामे जलदगतीने होण्यासाठी नवीन कार्यप्रणाली विकसित करणे गरजेचे असणे, पूर्णवेळ शिक्षकाला आठवडयाला १७ घड्याळी तास व अर्धवेळसाठी ८.३० तास कार्यभार ठेवण्याची आवश्यकता, सीबीएसई/आयसीएसई शाळांवर राज्य शासनाचे नियंत्रण गरजेचे असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**दहा : अर्धा-तास चर्चा म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी)**

(१) **श्रीमती उमा खापरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**"मुंबईतील मॉलमधील सुरक्षिततेचे निकष न पाळणाऱ्या गेमिंग झोनविरुद्ध कारवाई करणेबाबत"** या विषयावरील श्री.सुनिल शिंदे व इतर वि.प.स. यांचा दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्र. १८ मधील अतारांकित प्रश्न क्रमांक १९१ ला दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

(२) **सर्वश्री सतेज ऊर्फ बंटी पाटील, अभिजित वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**"राज्यात स्वतंत्र अत्याधुनिक हवामान अंदाज प्रणाली विकसित करण्याबाबत"** या विषयावरील श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील व इतर वि.प.स. यांचा दिनांक १३ मार्च, २०२६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्र.८ मधील अतारांकित प्रश्न क्रमांक ४५४२ ला दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक :६ जुलै, २०२६.

**डॉ. विलास आठवले,**
सचिव-३ ,
महाराष्ट्र विधानपरिषद.